गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ५५ वा ● गुरुवार ११ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 55 | Date : 11/07/2024 blow Thursday Page 4 Price 4


## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा उद्या सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार



दैनिक यशसिध्दि न्यूज

सोलापूर/प्रतिनिधीः फलटण येथून माउलींच्या पालखी रथ सकाळी बरडच्या दिशेला मार्गस्थ झाला. आळंदी संस्थांन कडून दिलेल्या सूचनांचे पालन प्रशासनाकडून होत नसल्याने वादावादीचे प्रसंग झाले.

बरड-फलटण येथील आपला मुक्काम आटोपून माउलींच्या पालखीने आज सकाळी पंढरपूरच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले. 'हरिनामाचा गजर' करत पालखी शुक्रवारी सायंकाळी सातारा जिल्ह्यातील सीमेवरच्या बरड (ता. फलटण) गावी विसावली.आज सकाळची आरती झाल्यावर पालखी बरडकडे मार्गस्थ झाली. सकाळी विडणी येथे चहापान झाले. तेथील नीरानदीच्या रामरामोशी पुलावर माउलींच्या स्वागतासाठी मोठी गर्दी झाली होती. ज्ञानोबांच्या पालखीसोहळ्याने नीरा नदीला प्रदक्षिणा घालत बरडकडे प्रस्थान ठेवले. पालखी दुपारी दोनच्या दरम्यान पिंपरद येथे दुपारच्या विसाव्यासाठी व न्याहरीसाठी थांबली. या वेळी चोहोबाजूंनी माउलींचा गजर सुरू होता. रात्रीच्या मुक्कामासाठी सायंकाळी उशिरा माउलीची पालखी बरड (ता. फलटण) येथे दाखल झाली. बरड येथे आज मुक्काम असून उद्या पालखी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार आहे.

फलटण येथून माऊलींच्या पालखी रथ सकाळी बरडच्या दिशेला मार्गस्थ झाला. आळंदी संस्थान कडून दिलेल्या सूचनांचे पालन प्रशासनाकडून होत नसल्याने वादावादीचे प्रसंग झाले. त्याबद्दल आळंदी संस्थान कमिटी कडून तीव्र नाराजी व्यक्त केली . तसेच वाहतूक सुरळीत करण्यासाठी श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथ, गुरु हैबतबाबा यांचे वंशज बाळासाहेब पवार (आरफळकर) । पान २ वर

# दूधात भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विधानसभेत घोषणा

मुंबई : राज्यातील नागरिकांना गायी-म्हैशीचे निर्भेळ दूध मिळावे, दुधात भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी यासाठी राज्य शासन गंभीर आहे. दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाला अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आणि पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. दूधभेसळीसंदर्भात विधानसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती सभागृहाला दिली.



उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, दूधभेसळीच्या समस्येची गंभीरता लक्षात घेऊन यापूर्वी राज्य सरकारने दोषींना फाशीची शिक्षा देण्याचा कायदा केला होता. हा कायदा राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. मात्र, दूधभेसळीच्या गुन्ह्यात फाशीची शिक्षा देणे ही शिक्षा तुलनेने फार मोठी असल्याचे राष्ट्रपती कार्यालयाचे मत असावे, त्यामुळे त्यावर अद्याप राष्ट्रपतींची सही झालेली नाही.

दूधात अजिबात भेसळ होऊ नये, ग्राहकांना निर्भेळ-भेसळमुक्त दूध मिळावे, अशीच राज्य शासनाची भूमिका आहे. याबाबत शासन गंभीर असून त्यासंदर्भात वित्तमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली, संबंधित मंत्री महोदयांच्या उपस्थितीत अन्न व औषध प्रशासन विभागाची बैठक घेतली जाईल. दूध भेसळ रोखण्यासाठी विभागाला आवश्यक असणारे मनुष्यबळ, यंत्रसामग्री, अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. दूध भेसळ रोखण्यासंदर्भातील प्रक्रियेत काही त्रुटी । पान २ वर

## उजनी धरणात महिनाभरात १३ टीएमसी पाणीसाठा वधारला

दैनिक यशसिध्दि न्यूज

सोलापूर/प्रतिनिधी : भीमा खोऱ्यात अधुनमधून कमीजास्त पडणाऱ्या पावसामुळे सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणात मागील महिनाभरात १३ टीएमसी एवढा पाणीसाठा वाढला आहे. वजा पातळीवर तब्बल ६० टक्क्यांपर्यंत खालावलेल्या धरणात सध्या वजा ३७.७५ टक्के पाणीसाठा आहे. त्यात कासवगतीने का होईना, वाढ होऊ लागल्यामुळे धरणाच्या लाभक्षेत्रासह सोलापूरकरांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मात्र भीमा खोऱ्यात पडणाऱ्या पावसात सातत्य नसल्यामुळे अजूनही धरण वधारण्याच्या अनुषंगाने सतत पावसाची गरज आहे. मात्र पावसाचा आशा-निराशेचा खेळ सुरूच आहे.

बुधवारी सकाळी धरणात एकूण पाणीसाठा ४४.०४ टीएमसी तर उपयुक्त पाणीसाठा वजा १९.६२ टीएमसी एवढा होता. मात्र भीमा खोऱ्यात पावसाने पुन्हा ओढ दिल्यामुळे दौंड येथून उजनी धरणात मिसळणाऱ्या पाण्याचा प्रवाह मंदावला आहे. काल मंगळवारपर्यंत दौंड येथून ७८४४ क्युसेक विसर्गाने धरणात पाणी मिसळत होते. मात्र दुसऱ्या दिवशी त्यात घट होऊन ६२७५ क्युसेक विसर्गाने धरणात पाणी मिसळत होते. सध्या दररोज सुमारे अर्धा टक्का पाणी वाढत असल्याचे दिसून येते. पुण्याच्या बंडगार्डनमधून अद्याप पाणी सोडण्यात आले नाही. कारण तेथे पावसाचा जोर कमी आहे. । पान २ वर

## महाराष्ट्र देशात सर्वोत्कृष्ट कृषी राज्य, मुख्यमंत्र्यांनी स्वीकारला पुरस्कार

दैनिक यशसिध्दि न्यूज

नवी दिल्ली : पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून राज्याकडून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेत, १५ व्या कृषी नेतृत्व समितीचा २०२४ चा प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा पुरस्कार राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत स्वीकारला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार आज प्रदान करण्यात आला.

१५ व्या कृषी नेतृत्व समितीच्या-२०२४ कॉनक्लेव्हचे एग्रीकल्चर टुडे समूहाच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश व केरळचे राज्यपाल पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखाली १५व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा आणि शाश्वत विकास धोरणांची दखल दखल घेत महाराष्ट्र राज्याला सर्वोत्तम कृषी राज्य म्हणून निवड केली आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान, एग्रीकल्चर टुडे समूहाचे अध्यक्ष डॉ. एम.जे. खान, राज्याच्या कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल व इतर मान्यवर उपस्थित होते.




पुरस्कार स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील कृषी विकासाच्या विविध योजना आणि शाश्वत विकासासाठीच्या प्रयत्नांची माहिती दिली. यावेळी माहिती देताना ते म्हणाले, महाराष्ट्र हे कृषी क्रांतीचं जनक राज्य आहे. महाराष्ट्राला हरित क्रांतीची समृद्ध परंपरा आहे आणि कृषी व शेतकऱ्यांचा सन्मान करण्याची गौरवशाली परंपरा देखील आहे. राज्याचे प्रमुख म्हणून हा पुरस्कार स्वीकारताना मला आनंद होत आहे.मी एक सामान्य शेतकरी कुटुंबातून आलो असून हा पुरस्कार स्वीकारताना मला मोठा अभिमान वाटतो. महाराष्ट्र राज्याला कृषी क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्याच्या रूपात निवडल्याबद्दल 'एग्रीकल्चर टुडे' आणि परीक्षक मंडळाचे आभार मानत, हा पुरस्कार राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सन्मान आहे. शेतकऱ्यांचे कष्ट, मेहनत आणि मातीच्या प्रेमाचं ही फलश्रुती आहे. आमच्या शेतकऱ्यांना। पान २ वर

### माऊली व तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेची यंत्रणेची जय्यत तयारी ..!

## जिल्हाधिकारी व सिईओ यांचा संयुक्त पाहणी दौरा..!




दैनिक यशसिध्दि न्यूज

सोलापूर/प्रतिनिधीः आषाढी यात्रा यशस्वी करणे साठी जिल्हा परिषदेने युध्दपातळीवर प्रयत्न सुरू ठेवले आहेत. आज सिईओ मनिषा आव्हाळे यांनी पालखी तळांची पाहणी करून वारकरी बांधवाच्या

सेवे साठी सज्ज राहणेचे सुचना दिल्या. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन सजग रहा असे सांगत चांगले काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांचे पाठीवर शबासकीची थाप दिली. दरम्यान आज जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद व सिईओ मनिषा आव्हाळे यांनी हिरकणी कक्ष व वारकरी यांचे साठी उभा करणेत आलेल्या आरोग्य केंद्रास

संयुक्तीक भेटी देऊन पाहणी केली.

आज सकाळी ८ वाजता गोपाळपूर, वाखरी, भंडीशेगाव, पिराची कुरोली, वेळापूर, पुरंदावडे, धर्मपुरी, अकलूज (संग्रामनगर) सराटी फाटा यासह बोरगाव, माळीनगर व तोंडले येथील पालखी तळ मुक्कामाची स्थिती जाणून घेतली. सध्या१)पालखी Vi water proof मंडप, तात्पुरते शौचालय स्थळ, स्नानगृह, पालखी, गोल/उभे रिंगण स्थळ, पालखी कट्टा सुशोभीकरण, पालखी मार्ग रस्ते, आपत्ती व्यवस्थापन केंद्र, हिरकणी कक्ष, पाणीपुरवठा विहीर व शुद्धीकरण, स्वागत कमान, रोषणाई, टॅंकर पाणी भरणा केंद्र, तात्पुरते आरोग्य केंद्र, प्लास्टिक/ कचरा संकलन केंद्राची पाहणी सिईओ मनिषा आव्हाळे यांनी । पान २ वर

## धाराशिवमधून जरांगे-पाटलांचा राज्य सरकारला इशारा

दैनिक यशसिध्दि न्यूज

धाराशिव: राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ऐकून छगन भुजबळ मराठा आरक्षणाला विरोध करत सुटले आहेत. त्यामुळेच ओबीसी नेते एकत्रित येवून मराठा आरक्षणाला विरोध करीत आहेत. शासनाकडे असलेल्या मराठ्याच्या कुणबी नोंदी रद्द करण्याची मागणी भुजबळांनी लावून धरली आहे. मराठ्यांविषयी कमालीचा आकस त्यांच्या मनात आहे. भुजबळांच्या मागणीप्रमाणे मराठ्यांच्या कुणबी नोंदी सरकारने रद्द केल्यास मराठ्यांची ताकद दाखवून देवू, राज्यातील ५५ टक्के समाजावर संयम सोडायची वेळ आणू नका. अन्यथा सरकारचे अवघड होईल, अशा शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला इशारा दिला.धाराशिव शहरात बुधवारी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा



जागृती शांतता रॅली काढण्यात आली. या रॅलीस जिल्ह्यातील हजारो मराठा बांधव, महिला उपस्थित होत्या. छत्रपती शिवाजी महाराज चौकात रॅलीचे रूपांतर सभेत झाले.

यावेळी जरांगे-पाटील म्हणाले की, आंदोलन थांबविण्यासाठी सरकारने चार न्यायाधीश, मंत्री, सचिव, आमदार, कायद्याचे, घटनेचे आणि आरक्षणाचे अभ्यासक आणले. ज्या मराठ्याची नोंद सापडली नाही, त्या मराठ्याच्या नोंदीआधारे कुणबी प्रमाणपत्र द्यायचे यावर एकमत झाले. नोंद असलेल्या आणि मागेल त्या मराठ्यांना त्या नोंदीआधारे कुणबी प्रमाणपत्र दिले. नोंदीच्या आधारावर सगेसोयरयांतील मराठ्यांना म्हणजेच मागेल त्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यायचे. कारण नोंद । पान २ वर

## महागाई भत्त्यात वाढ

दैनिक यशसिध्दि न्यूज

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना शिंदे सरकारने आणखी एक मोठं गिफ्ट दिलं आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात ४६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ आली आहे. १ जानेवारी २०२४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढ लागू केली जाईल. विधानसभा निवडणुकीआधी सरकारी कर्मचाऱ्यांना खुश करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

दिनांक १ जानेवारी, २०२४ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्याचा दर ४६ टक्केवरुन ५० टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्ता वाढ दिनांक १ जानेवारी २०२४ ते दिनांक ३० जून २०२४ या कालावधीतील । पान २ वर

## शहाजी हायस्कूलच्या कॉर्नरला खड्डे, अपघाताला निमंत्रण

दैनिक यशसिध्दि न्यूज

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट शहरातील श्री शहाजी हायस्कूलच्या कॉर्नरला तीन ते चार मोठ मोठे खड्डेच खड्डे निर्माण झाले आहेत आणि रस्त्यांची वाताहत,अपघाताला निमंत्रण. अक्कलकोट शहरातील श्री शहाजी हायस्कूल कॉर्नरला वर्दळीच्या असणाऱ्या रस्त्यावर तीन ते चार मोठ मोठे खड्डेच खड्डे निर्माण झाले आहेत. सदर खड्डे मोठ्या अपघाताला निमंत्रण देणारे ठरणार आहेत.

शाळा सुटताना व भरताना त्या परिसरात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व पालक असतात.नगरपालिकेने गेल्या आठवड्याभरापूर्वी अक्कलकोट शहरात विविध ठिकाणी पडलेले खड्डे बुजवण्यात आले आहेत परंतु श्री शहाजी हायस्कूलच्या कॉर्नरला पडलेले खड्डे अद्यापही बुजवले नाहीत नगरपालिकेने तात्काळ ते खड्डे बुजवून घ्यावे नाहीतर त्या खड्ड्यांमध्ये येत्या दोन दिवसात वृक्षारोपण करण्यात येईल असे इशारा सामाजिक कार्यकर्ता सोहेल फरास अक्कलकोट यांनी दिले



# संपादकीय

## अवमानजनक शब्द ..

राजकारणाचा स्तर, नीतिमत्ता याच्यावर कोणी काही बोलायची गरजच नाही. सारे काही डोळ्यांसमोर घडत आहे. कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले तरी पुढारी केवळ उजळ माथ्यानेच फिरत नाहीत तर मोठमोठी पदेही भूषवताना दिसतात. अलीकडेच झालेल्या लोकसभा निवडणुकीत नागरिकांनी अतिशय सुज्ञपणे मतदान केले. मात्र, तरीही सध्याच्या राजकारणाची बजबजपुरी पाहता एकाला झाकावे आणि दुसऱ्याला काढावे अशीच स्थिती बनली आहे. आता तर मजल थेट विधिमंडळातच शिवीगाळ आणि धमकी देण्यापर्यंत गेली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि अंबादास दानवे यांनी सभागृहातच भाजप आमदार प्रसाद लाड यांना शिवीगाळ केली. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त न करता सभागृहाबाहेर येऊन मी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचा कट्टर शिवसैनिक आहे. माझ्यावर कुणी बोट उचलले तर त्याचे बोट तोडायची ताकद माझ्या मनगटात आहे, अशी धमकीही त्यांनी दिली. शिवाय माझ्यावर दंगलीच्या ७५ केस आहेत, चार-चार वेळेस तडीपार झालेला माणूस असल्याचेही त्यांनी अभिमानाने सांगितले. हा तर कहरच झाला. दानवे यांच्या या वक्तव्याबद्दल ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सर्व माता -गिनींची माफी मागितली आहे, पण त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीदरम्यान चंद्रपूरच्या सभेत सुधीर मुनगंटीवार यांनी बहीण-भावाच्या नात्याबद्दल केलेल्या वक्तव्यावरून का कारवाई करण्यात आली नाही, असा प्रश्नही त्यांनी केला. अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजेच कोणी कशा प्रकारची भाषा वापरायची, हे स्वातंत्र्य आपल्या देशात असले तरी कोणासमोर कोणते शब्द वापरायचे याचे तारतम्य ज्याने त्यानेच बाळगण्याची गरज आहे. बेधडक कोणतेही वक्तव्य केले तर प्रसिद्धी मिळते हे खरे असले तरी त्यात उथळपणा, सवंगपणाच अधिक असतो. हा उथळपणा फार काळ टिकत नाही. जोपर्यंत भाषेला खोली येत नाही, तोपर्यंत आपला विचार कोणी गांभीर्याने घेणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे. विधिमंडळात माता- भगिनींचा असा उल्लेख करणे शोभनीय नाही. एकीकडे मातृशक्तीचा, स्त्रीशक्तीचा उदोउदो करीत विविध योजना जाहीर करायच्या आणि दुसरीकडे त्यांचाच अवमान करायचा, असला प्रकार निंदनीयच आहे. राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू केली आहे. आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून याची घोषणा केल्याचा आरोप समजू शकतो, पण माता-भगिनींबद्दल अवमानजनक शब्द हे स्वीकारार्ह असूच शकत नाहीत.

# राष्ट्रीय मत्स्य शेतकरी दिवस

भारताच्या एकूण जीडीपीच्या १ टक्के व कृषी जीडीपीच्या ५ टक्के वाटा मत्स्योत्पादनामार्फत येतो, आणि हे सर्व शक्य झाले आहे केवळ एका व्यक्तीमुळेज्यांना भारतातील नीलक्रांतीचे जनक म्हणजेच फादर ऑफ ब्लु रेवोल्युशन डॉ. हिरालाल चौधरी.

भारताचा पूर्व उत्तरी हिस्सा हा त्याच्या विशिष्ट संस्कृती व समुदायामुळे प्रसिद्ध आहे. याच भागातील एक राज्य आसाम; खरंतर हे राज्य चहाच्या मळ्यांसाठी सुप्रसिद्ध आहे. आसाममधील एका ठिकाण शिलाटी येथे सन १९२१ मध्ये डॉ.हिरालाल चौधरी यांचा जन्म झाला. शिलाटी हे ठिकाण सध्या बांग्लादेशात श्रीहट्टा नावाने ओळखले जाते. श्रीहट्टामधील सुरमा घाटीला लागून असलेल्या कुबाजपुर या छोट्या गावात गिरीशचंद्र चौधरी या सिविल इंजिनियरच्या घरात २१ नोव्हेंबर १९२१ रोजी यांचा जन्म झाला. अत्यंत प्रतिभाशाली विद्यार्थी असलेले हिरालाल चौधरी यांनी सन १९४१ मध्ये आपले बीएससीचे शिक्षण पूर्ण केले. सन १९४३ मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या अंतर्गत त्यांनी झुलॉजी या विषयात एमएससी पूर्ण केले. त्यानंतर सिलट येथील माणिकचंद महाविद्यालयात जैवविज्ञानिक विषयाचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली. सन १९४७ मध्ये भारत -पाक फाळणीच्यादरम्यान त्यांना नोकरी गमवावी लागली. सध्याच्या बांग्लादेशात स्थित असलेले श्रीहट्टा हे तत्कालीन पूर्व पाकिस्तानात येत असे. सन १९४८ मध्ये ते सेंट्रल इन्लँड फिशरीज रिसर्च इंस्टीट्युट, बरकपुर येथे कनिष्ठ संशोधन सहायक या पदावर रुजू झाले. एके दिवशी बरकपूर येथे रहात असताना गंगेच्या किनारी आढळणाऱ्या मासळीचे फुगलेले पोट दिसून आले, ते पोट दाबताच त्यातुन पारदर्शी अंडे बाहेर आले. निरीक्षणाकरिता त्यांनी ही अंडी एका भांड्यात जमा केली. निरीक्षणादरम्यान डॉ.चौधरी यांना कार्प माशांच्या प्रेरित प्रजननाची संकल्पना सुचली.

कार्प प्रजाती आशिया व युरोप खंडातील मूळ निवासी मत्स्य प्रजाती मानली जाते. तलावातील बंदिस्त प्रणाली कार्प प्रजातीच्या प्रजननासाठी प्रतिकुल असल्याने अशा वातावरणाचा परिणाम माशाच्या पियुषिका ग्रंथी व जननग्रंथीवर होत असे. या दोन्ही ग्रंथीच्या अपु-या स्त्रावामुळे माशाचे बंदिस्त प्रणालीत प्रजनन होत नसे. त्याकाळात कार्प प्रजातीच्या संवर्धनाकरिता संपूर्णपणे नैसर्गिक बीजावर अवलंबून रहावे लागत असे.

मत्स्यबीज उत्पादनाची समस्या सोडविण्याकरीता प्रेरीत प्रजननाच्या तंत्रज्ञानाचा शोध लागला. या शोधामुळे भारतात आज रोजी मोठ्याप्रमाणात भुजलाशयीन मत्स्योत्पादन घेतले जाते. भूजलाशयीन मत्स्यप्रजातीमध्ये कार्प मासळीला जागतिक बाजारपेठेत अनन्य साधारण महत्त्व आहे. सर्वप्रथम हा प्रयोग 'स्मॉल मड गोबी प्रजातीच्या माशांवर करण्यात डॉ. चौधरी यांना यश मिळाले. त्याच वेळी सन १९५० मध्ये त्यांची वरिष्ठ संशोधन सहायक या पदावर 'सेंट्रल इंनलँड फिशरीज रिसर्च इंस्टिट्युटच्या पाँड कल्चर सेक्शन मध्ये पदोन्नतीने नियुक्ती झाली. जेथे ते डॉ. अलीकुन्ही यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत होते. डॉ.अलीकुन्ही यांनी डॉ.चौधरी यांना त्यांच्या प्रयोगाचे कार्य करण्याकरिता नेहमी प्रेरणा दिली. त्याचबरोबर अमेरिकेतील अबुरान विद्यापीठातील मत्स्य प्रेरित प्रजनन या विषयात पारंगत असलेल्या जगभरात प्रख्यात डॉ.स्विंगल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत त्यांना अमेरिकेत पाठवले. सन १९५५ मध्ये Ptutory Gland Extract (पियुषिका ग्रंथीच्या अर्क) चा मत्स्य प्रजननावर होणारा परिणाम या विषयाच्या शोधनिबंध लिहिला. या निबंधाच्या सहाय्याने अमेरिकेतील अबुरान विद्यापीठामधून 'मत्स्यपालन व्यवस्थापन' या विषयातून मास्टर ऑफ सायन्स ही पदवी मिळवली व त्यानंतर ते भारतात परतले.

भारतात परतल्यानंतर सन १९५५-५६ मध्ये त्यांनी देशातील काही मुळनिवासी प्रजातींच्या माशांचे प्रेरीत प्रजनन यशस्वीरित्या पूर्ण केले. पुढे डॉक्टर आलीकुन्ही यांनी सेंट्रल इनलँड फिशरीज रिसर्च इन्स्टिट्यूट येथे प्रेरित प्रजानाद्वारे मत्स्यबीज निर्मिती या विषयावर ओरिसा या ठिकाणी एक मोठा प्रकल्प राबवला व १० जुलै १९५७ रोजी या दोन शास्त्रज्ञांना प्रेरीत मत्स्यप्रजजननाच्या प्रयोगात यश मिळाले. व त्यानंतर भारतातील मत्स्य शेतीचा चेहरा मोहरा बदलला.

डॉ.हिरालाल चौधरी यांना मिळालेले हे यश भारतातील नीलक्रांतीची सुरुवात ठरली.प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आलेल्या प्रेरीत प्रजननातून तयार झालेल्या मत्स्यजिऱ्यांना यशस्वीरित्या अर्ध बोटुकली व त्यानंतर बोटुकली आकारापर्यंत विकसित करण्यात आले. सन १९५८ मध्ये डॉ.हिरालाल चौधरी यांनी जगात सर्वप्रथम लेबिओ, सि-हीनस व कटलासारख्या मत्स्य प्रजातींचे यशस्वीरित्या प्रजनन करून मोठ्या प्रमाणात मत्स्य बीज निर्मिती करण्याची संकल्पना जगापुढे मांडली. एवढेच नव्हे तर हे तंत्र मत्स्य शेतकऱ्यांपर्यंत तातडीने पोहचवण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात तेथील स्थानिक मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिका-यांना या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले. व त्यांचा मदतीने अत्यंत अल्प कालावधीत हे तंत्रज्ञान सर्वसामान्य मत्स्य शेतकऱ्यांपर्यंत पोहविण्याचे कार्य केले.

डॉ.चौधरी यांच्या यशस्वी प्रयोगामुळे भारतातील भूजलाशयिन मत्स्य उत्पादनात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे. डॉ.हिरालाल चौधरी यांची पुढे पदोन्नती मत्स्य व्यवसाय विस्तार अधिकारी या पदावर १९५९ मध्ये झाली. त्यांना कलकत्ता युनिव्हर्सिटीने १९६१ मध्ये आचार्य पदवी प्रदान केली. या पदवी अभ्यासक्रमात त्यांनी 'पियुषिका ग्रंथी अर्काचा मासळीच्या प्रजननावर होणारा परिणाम' हा शोध निबंध लिहिला.त्यानंतर सन १९७१ ते १९७५ मध्ये त्यांनी भुवनेश्र्वरमध्ये स्थित सेन्ट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फ्रेश वॉटर एक्काकल्चर येथे कार्य केले.

१९७५ मध्ये पॅसिफिक सायन्स कॉंग्रेस दरम्यान जपानचे प्रख्यात डॉ. कुरोनुमा यांनी त्यांना 'फादर ऑफ इंड्युस्ड ब्रीडिंग' हा किताब बहाल केला. त्याचबरोबर डॉक्टर चौधरी यांना गॅमा-सिग्मा-डेल्टा पुरस्कार, चंद्रकला होरा मेमोरियल गोल्ड मेडल, रफी अहमद किदवाई, गोल्डन की, वर्ल्ड क्काकल्चर वार्ड इत्यादी अनेक पुरस्काराने सन्मानित केले गेले.

सन १९७६ मध्ये स्वेच्छा निवृत्ती घेतल्यावर डॉ.चौधरी यांनी फूड अँड ग्रीकल्चर ऑर्गनायझेशन ऑफ युनायटेड नेशन (F-O), साउथ ईस्ट एशियन फिस्टीज डेव्ह डेव्हलपमेंट सेंटर (SE-FDEC) सारख्या अनेक महत्त्वपूर्ण संस्थान बरोबर काम केले. डॉ.हिरालाल चौधरी यांना मिळालेले यश भारतातील नीलक्रांतीची सुरुवातीस कारणीभूत ठरले. सन २००१ मध्ये डॉ.हिरालाल चौधरी यांच्या कार्यास सन्मानित करण्यासाठी भारत सरकारद्वारे १० जुलै हा दिवस राष्ट्रीय मत्स्य-शेतकरी दिवस म्हणून घोषित करण्यात आला. अशा महान व्यक्तीचे कार्य मत्स्य व्यवसायाशी निगडित प्रत्येक व्यक्तीच्या चिरस्मरणी रहावे, म्हणून आजचा दिवस साजरा करण्यात येतो.

**अमिता रा.जैन**
**सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी,**

पान १ वरुन

## जिल्हाधिकारी व सिईओ ..

विभाग प्रमुखासह केली. संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखीचे फुलाच्या वर्षावात स्वागत!

करमाळा तालुक्यात रावगाव येथे संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखीचे फुलाच्या वर्षावात स्वागत केले. दोन्ही बाजूने जेसीबी चे बकेट मधून फुले टाकून स्वागत करणेत आले. मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी जिल्हात येणारे सर्वच पालख्यांना चांगल्या सुविधा देणेचे आदेश दिले होते. गटविकास अधिकारी मनोज राऊत व टीमने जय्यत तयारी केली होती. पालखी सोहळा प्रमुख कांचनताई महाराज जगताप यांचे गटविकास अधिकारी राऊत यांनी स्वागत केले. विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे, सरपंच रोहिणी संदीप शेळके , ग्रामसेवक रामभाऊ हजारे यांनी व्यवस्थेची माहिती. पालखी सोहळा प्रमुखांना दिली. वारकरी बांधवांना मसाज सुविधा, मोफत कटींग पासून स्नानगृह व शौचालय सुविधा पुरविणेत आले आहे. विठुरायाच्या भुमीत झालेल्या स्वागताने वारकरी भारावून गेले होते.

## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी..

रस्त्यावर स्वतः गर्दीवर नियंत्रण केले.माऊलींची पालखी बरडच्या दिशेने मुक्कामासाठी जात असते. जाताना विडणी येथे पहिला विसावा असतो. यावेळी पालखीतील वाहने पुढे जाणे अपेक्षित असते. पुढे जाऊन दिंडीतील वारकऱ्यांना नाष्टा केला जातो. परंतु वाहने अडविल्यामुळे दिंडीतील वाहने अडकून पडली. त्यामुळे दिंडीतील काही चालकांनी विश्र्वस्तांना कल्पना दिल्यानंतर विश्र्वस्त स्वतः वाहन नियंत्रित नियंत्रण करू लागले. त्यावेळी वारकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.

संत ज्ञानेश्र्वर माऊली सर्व समाजासाठी सर्व समाजाला सोबत घेऊन बाहेर निघतात. यावेळी वारकऱ्यांची सेवा करणे सर्व समाजाचे आणि प्रशासनाचे कर्तव्य आहे. वारी निघण्यापूर्वी संस्थांकडून सर्व प्रशासनाला योग्य त्या सूचना केलेल्या असतात. वारीवर नियंत्रण करण्यासाठी आमची स्वतःची यंत्रणा आहे. संस्थांनचे विश्र्वस्त आणि कर्मचारी ते करत असतात. वारी कशी नियंत्रित करायची हे आम्हाला कोणीही सांगायची गरज नाही. पालखी सोहळ्यातील नगारा, अश्र्व, पालखी रथ आणि वारकरी एवढाच सोहळा असत नाही. हे प्रशासनाने लक्षात घ्यावे. यापुढे कोणतेही वादाचे प्रसंग खपवून घेतले जाणार नाहीत. वारकऱ्यांना व दिंड्यांना आणि दिंड्यांतील वाहनांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यायची आहे. बाळासाहेब पवार (आरफळकर),पालखी सोहळा व संस्थानचे विश्र्वस्त

## दूधात भेसळ करणाऱ्यांवर ..

राहिल्या असतील तर त्या दुरुस्त करण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात दिली.

सध्याच्या परिस्थितीत दूध उत्पादकांच्या दुधाला बऱ्यापैकी दर मिळू लागले आहेत. अशावेळी झोपडपट्टी भागामध्ये किंवा इतर अज्ञात ठिकाणी काही व्यक्तींकडून भेसळ केली जात असल्याचे निर्दर्शनास आले आहे. जास्त दर असणाऱ्या ब्रॅन्डच्या दूध पिशव्यांमध्ये पाणी मिसळणे, इंजेक्शनने भेसळसारखे गैरप्रकार केले जातात. अशा भेसळयुक्त दुधामुळे आजार बळावतात, जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. या गोष्टी अतिशय गंभीर असून त्यासंदर्भात अत्यंत कडक भूमिका घेण्याची राज्य शासनाची तयारी आहे. या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

## उजनी धरणात महिनाभरात..

मृग नक्षत्राच्या पहिल्याच दमदार पावसाचा फायदा उजनी धरणाला होऊन सुमारे आठ हजार क्युसेक विसर्गाने धरणात पाणी मिसळत होते. परंतु नंतर त्यात पाच हजार क्युसेकने घट होऊन साधारणतः अडीच हजार ते तीन हजार क्युसेक विसर्गाने धरणात हळूवारपणे पाणी मिसळत होते. दोन दिवसांपूर्वी धरणात मिसळणाऱ्या पाण्याचा विसर्ग सुमारे आठ हजार क्युसेकपर्यंत वाढला होता. त्यात पुन्हा घट होत आहे. पावसाने दडी मारल्यामुळे आठवडाभर धरणातील पाणीसाठ्याची स्थिती जवळपास जैसे थे होती. नंतर पावसाने पुन्हा हजेरी लावण्यास सुरुवात केल्यामुळे उजनी धरणातील पाणीसाठा हळूवारपणे वाढत असताना पुन्हा पावसाने दडी मारली आणि उजनी धरणात जमा होणारा पाणीसाठा पुन्हा मंदावल्याचे दिसून येते.

गेल्या ८ जूनपर्यंत धरणात पाणीसाठा वजा पातळीवर ५९.९९ टक्क्यांपर्यंत खालावला होता. त्यावेळी धरणातील एकूण पाणीसाठा केवळ ३१.५८ टीएमसीपर्यंत मर्यादित होता. ६३ टीएमसीपर्यंत पाणीसाठा वजा पातळीत मानला जातो. धरणाची एकूण पाणीसाठवण क्षमता १२३ टीएमसी एवढी मोठी आहे. सोलापूर जिल्ह्याच्या शेतीसह उद्योग आणि दैनंदिन पिण्याच्या पाण्यासाठी वरदान ठरलेले उजनी धरण गतवर्षी जेमतेम पाऊसमान झाल्यामुळे केवळ ६०.६६ टक्क्यांपर्यंतच भरले होते. त्यात पुन्हा बेसुमार पाणी वाटप झाल्यामुळे पाणीसाठा झपाट्याने वजा पातळीवर गेला होता.

## महाराष्ट्र देशात सर्वोत्कृष्ट कृषी ..

'अन्नदाता' म्हणून मान दिला जातो आणि राज्य सरकारने त्यांच्या हितांसाठी सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

महाराष्ट्रातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास उत्सुक आहेत आणि आम्ही प्रगतिशील शेतकऱ्यांचा सन्मान करत असतो, जेणेकरून अधिकाधिक शेतकरी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करतील. बदलत्या काळानुसार आणि हवामानातील बदल पाहता, आमचा शेतकरी सदैव जागरूक आहे आणि त्यामुळेच महाराष्ट्र कृषी क्रांतीत अग्रेसर असल्याची माहिती दिली .युनोचे सरचिटणीस अँण्टिवो गुट्रेस यांनी तापमान वाढीचे युग संपले असून, होरपळीचे युग सुरु झाल्याचे आणि तातडीच्या प्रयत्नांची गरज असल्याचे सांगितले होते. महाराष्ट्र सरकारने या आव्हानाला प्रतिसाद देत २१ लाख हेक्टरवर झाडे लावण्याचा आणि ५ टक्के बायोमास वापरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्राने जगातील मानव जात वाचवण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत असेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्य शासनाने बांबू मिशनला प्राधान्य दिले असून, बांबू ही विशेष वनस्पती असल्याचे सांगत, बांबू पासून २००० प्रकारच्या वस्तू तयार याची माहिती होत असल्याची माहिती श्री. शिंदे यांनी यावेळी दिली. 'बांबू घास नही खास है' असे म्हणत बांबू मुळे पर्यावरण संवर्धन आणि अन्न सुरक्षा यावरही भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबविल्या आहेत आणि त्यांना कर्जमाफीसाठी सहकार्य केलं आहे. तसेच, पीक विमा योजनेत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. लातूर जिल्ह्यात देशातील पहिला मायक्रो मिलेट क्लस्टर सुरू केला आहे आणि सिंचन प्रकल्पांद्वारे १७ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचा ध्येय निश्र्चित केले आहे.राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचं ठरवले आहे आणि कपास व सोयाबीन शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत असल्याचे माहिती दिली.

राज्यातील कृषी क्षेत्रातील क्रांतिकारी निर्णयांमुळे महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार मिळाला आहे. यामध्ये मायक्रो मिलेटचे उत्पादन वाढ, पीएम किसान सन्मान निधी दुप्पट, नॅनो-तंत्रज्ञान खतांचे वितरण, तृणधान्यांना एमएसपी, हरित पट्टा निर्माण आणि सिंचन क्षमता वाढ यांचा समावेश आहे.बांबूविषयी राज्य सरकारकडून घेतलेल्या उपायांची केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडून कौतूक

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाकडून हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी सुमारे १० लाख हेक्टर जमिनीवर बांबूची लागवड करण्याचा घेतलेला क्रांतिकारी निर्णय कौतुकास्पद आहे, असे केंद्रीय कृषिमंत्री श्री. चौहान यांनी कौतुक केले.

## धाराशिवमधून जरांगे-पाटलांचा..

असलेल्या आणि नोंद नसलेल्या मराठ्यांचा व्यवसाय एकच आहे, तो म्हणजे शेती. त्यामुळे सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी आपण सरकारपुढे ठेवली. ती मागणी मान्य होईलच. परंतु मराठ्यांनी आपली खंबीर साथ सोडू नये. मराठ्यांचे दुःख, वेदना दूर करायची असेल तर आरक्षण हाच सक्षम पर्याय आहे. आणि तो मिळविल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, असा शब्दही जरांगे पाटील यांनी यावेळी दिला.

साडेतीनशे युवकांचे बलिदान वाया जावू देणार नाही. अनेक मराठा भगिनींचे कपाळ पांढरे झाले आहे. आता यापुढे पुन्हा तसे होवू द्यायचे नाही. गरीब मराठ्यांचा मुलगा आयएएस, आयपीएस झालेला आपल्याला पहायचे आहे. काळ्याकुट्ट अंधारात आत्महत्याग्रस्त मराठ्याच्या घरातील महिला रडत आहे. तिच्या मांडीवर अनाथ लेकरेही रडत आहेत. आत्महत्या झालेल्या मराठ्याच्या कुटुंबाची अवस्था सरकारने उघड्या डोळ्यांनी बघावी. तेंव्हाच त्यांना मराठा समाजाच्या खर्या वेदना कळतील. त्यांच्या घरातील कोणी मरत नाही तोवर त्याची जाणीव भुजबळ, फडणवीसांना होणार नाही. मराठा युवकांनी आरक्षणासाठी देह त्याग केला, हे आम्ही कदापि विसरणार नाही. भुजबळ, फडणवीस आणि सरकारनेही हे ध्यानात ठेवावे. मराठ्यांनी जातीशी एकनिष्ठ राहून लढा दिला तर, आरक्षण पदरात पाडून घेतल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, असेही जरांगे पाटील यांनी यावेळी नमुद केले. या सभेला मराठा समाजबांधवांची मोठी गर्दी होती. महिला, लहान मुले आणि वृध्दांची संख्याही लक्षणीय होती.

## महागाई भत्त्यात वाढ

थकबाकीसह माहे जुलै, २०२४ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी, असा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वर्षातून २ वेळा वाढ करण्यात येत असते. १ जानेवारी २०२४ मध्ये महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. ४२ टक्के महागाई भत्ता होता. हा महागाई भत्ता २३ नोव्हेंबर २०२३ मध्ये वाढवण्यात आला. त्यानंतर महागाई भत्ता ४२ टक्क्यांवरुन ४६ टक्के इतका झाला. अशातच आता विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर त्यानंतर आता जुलै २०२४ मध्ये महागाई भत्त्यात वाढ करण्यात आली आहे. आता महागाई भत्ता ४ टक्क्यांनी वाढला आहे त्यामुळे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५० टक्के इतका झाला आहे.

जगातील अनेक घटकांमुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सतत बदलत असतात. त्यामुळे महागाई वाढत असते. कर्मचाऱ्यांना वाढत्या महागाईचा सामना करता यावा यासाठी महागाई भत्त्याची निर्मिती करण्यात आली होती. केंद्र व राज्य सरकारी कर्मचारी, सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी आणि निवृत्तिवेतनधारक यांना महागाई भत्ता दिला जातो. दर सहा महिन्यांनी महागाई भत्त्याचा आढावा घेऊन त्यात वाढ केली जाते.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पंढरीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने केला नितेश राणे यांचा निषेध



**दैनिक यशसिद्धि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने आज जिल्हाप्रमुख संभाजी राजे शिंदे यांच्या आदेशाने वाचाळ वीर नितेश राणेचा जाहीर निषेध करण्यात आला मुख्यमंत्री तथा पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांचे चिरंजीव तेजीसजी ठाकरे हे उद्योगपती अनिल अंबानी यांच्या मुलाच्या लग्नात इतर सेलिब्रिटी सोबत नाचले म्हणून निलेश राणे यांनी वाचाळ बडबड करून तमाम शिवसेना यांच्या भावना दुखावल्या. मा. तेजस जी ठाकरे यांच्यावर टीका करण्याचा काही एक अधिकार निलेश राणेंना नसताना फक्त प्रसिद्धीच्या हेतूने निलेश राणे यांनी उद्गार काढून ही बडबड केली त्यांचा पंढरपूर तालुका शिवसेना कडून जाहीर निषेध नोंदवून तहसीलदार पंढरपूरला निवेदन देण्यात आले यावेळी तालुका प्रमुख बंडू घोडके ज्येष्ठ शिवसैनिक बाळासाहेब बोराडे उपप्रमुख उत्तम अण्णा कराळे नागेश रे तोंड लंकेश दादा बुरांडे महादेव अंधारे संजय पवार हनुमंत हांडे कल्याण कदम तालुका मुख्य अधिकारी समाधान गोरे धनाजी भोसले आधी जण उपस्थित होते

# महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेच्या अधिपत्याखाली सहकार पॅनल चा दणदणीत विजय

**दैनिक यशसिद्धि न्यूज**

बुलढाणा / राहुल साबळे : वीज कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या बुलढाणा जिल्हा र. नं.२११ च्या सण २०२४-२०२९ च्या पंचवार्षिक निवडणुकीत एम एस ई वर्कर्स फेडरेशन च्या सर्व ११ संचालकांचा दणदणीत विजय झाला आहे. त्यानिमित्ताने चिखली रोडवरील शाहू बँकेच्या समोर असलेल्या कार्यालयासमोर मोठी गर्दी होती आणि कार्यकर्त्यांचा एकच जल्लोष होता.



वर्कर्स फेडरेशनच्या अधिपत्यातील बुलढाणा सहकारी पतसंस्था ची दिनांक ७ जुलै रोजी सण २०२४ ते २०२९ पंचवार्षिक निवडणूक संपन्न झाली त्या निवडणुकीत वर्कर्स फेडरेशन पुरस्कृत सहकार पॅनलच्या विरुद्ध ९ संघटनांनी एकत्रितपणे विरोधात एकत्र पॅनल टाकले होते वर्कर्स फेडरेशनच्या पतसंस्था चा कारभार स्वच्छ व पारदर्शक, सभासद हित जोपासणारे असल्यावर ही वर्कस फेडरेशनचा अपप्रचार करण्याचा प्रयत्न विरोधी पॅनलने केला ९ संघटनेचे पदाधिकारी एकत्र येऊन अप्रचार केला तरी सुज्ञ सभासद यांनी त्यांची काय जागा आहे हे निवडणुकीतून त्यांच्या ११ उमेदवारांचा पराभव करून व वर्कर्स फेडरेशनचे ११ उमेदवार विजयी करून दाखवून दिली. त्यात सर्वसाधारण मतदारसंघात श्री अनिल चव्हाण, श्री रमेश तांबे ,श्री संतोष दंदाले, श्री श्याम भोजने, श्री विजय लोंढे ,श्री पंजाबराव शेळके ,हे सर्व विजय झाले तसेच इतर मागास प्रवर्ग मधून श्री विजय चवरे हे विजय झाले. अ.ज.क./वि.मा. प्रवर्गातील श्री गजानन जायभाये हे निवडून आले. अनुसूचित जाती /जमाती मधून श्री संदीप गव्हांदे हे निवडून आले. महिला राखीव प्रवर्गातील सौ अर्चना काटे व सौ हर्षा चिडे या निवडून आल्यात.

सभासदांनी एम एस ई वर्कर्स फेडरेशन व कॉ. सी एन देशमुख (कार्याध्यक्ष एम एस ई वर्कस फेडरेशन) यांच्यावर व वर्कर्स फेडरेशनच्या केंद्रीय नेतृत्वावर विश्वास दाखवत एम एस ई वर्कर्स फेडरेशनच्या सर्व ११ संचालक मंडळास निवडून देत प्रचंड मतांनी विजयी केले या निवडणुकीत कॉ. शैलेश तायडे संयुक्त सचिव, कॉ. एन वाय देशमुख (सरचिटणीस कंत्राटी कामगार) कॉ. जी जे देशमुख कें. का. सदस्य, कॉ. विलास गवई के. का. सदस्य व वर्कस फेडरेशनचे सर्व पदाधिकारी ,सदस्य, कार्यकर्ते यांनी एकत्रित प्रचाराचे कामे करून दणदणीत विजय मिळवला व वर्कर्स फेडरेशनचा बुलढाणा हा बालेकिल्ला अभेद्य ठेवला.

## हिवरखेड पूर्णा येथील बैठे पथकाला रात्री तहसिलदार यांनी दिली भेट

**अवैध रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी बैठे पथकाची स्थापना**



**दैनिक यशसिद्धि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे :सिंदखेड राजा तालुक्यातील निमगांव वायाळ व हिवरखेड पूर्णा येथून मोठ्या प्रमाणात अवैध रेती उखनन होत असल्याच्या तक्रारीवरून वरील गावामध्ये अवैध रेतीला आळा घालण्यासाठी तहसिलदार प्रविण धानोरकर यांनी बैठे पथकाची स्थापना केली आहे सदर बैठे पथक नदीपात्रा जवळ असते का नाही हे पाहण्यासाठी ता ८ जुलै रोजी रात्री तहसिलदार प्रविण धानोरकर यांनी हिवरखेड पूर्णा येथील बैठे पथकाला अचानक भेट दिली असता तलाठी लांडगे तलाठी मोगल तलाठी गिरी हे येथे उपस्थित होते यावेळी तहजिलदार प्रविण धानोरकर यांनी सदर नदीपात्राची पाहणी केली व येथून अवैध रेतीची वाहतूक व उत्खनन होणार नाही या सबधी सुचना पथकास दिल्या आहे

# शहरमध्यची जागा आडम मास्तर यांना सुटणार

## माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची हमी

**दैनिक यशसिद्धि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः भारतात लोकशाही आणि समाजवादाची मुल्ये जोपासणाऱ्या डाव्या पक्षांचे नेहमीच जनतेच्या हिताकरिता आग्रही राहिलेले आहे. २००४ साली संयुक्त पुरोगामी आघाडी च्यावतीने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांना सोलापूर शहर दक्षिणची जागा आघाडीत सोडून निवडून आणले.



वास्तविक पाहता त्यावेळी काँग्रेस पक्षाकडून मा. प्रकाश यलगुलवार यांचे नाव आघाडीवर होते. मात्र कामगार वर्गाचा प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्राचा बुलंद आवाज विधीमंडळात सर्वसामान्यांचे प्रश्न पोटतिडकीने तडफेने मांडणारा आमदार म्हणून त्यांची नितांत गरज होती. याकरिता त्यांना २००४ साली आघाडीत जागा सोडण्यात आले. यावेळी शहरमध्य विधानसभा मतदार संघातील विद्यमान आमदार प्रणिती शिंदे या नुकतेच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत सोलापूरचे खासदार म्हणून संसदेत गेलेले आहेत. तेंव्हा शहरमध्य विधानसभा मतदार संघात कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांना आघाडीत जागा देण्यासंबंधी काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत समितीत चर्चा घडेल व २००४ सालची पुनरावृत्ती यावेळीही होईल असे सकारात्मक आश्वासन आडम मास्तर व सुशीलकुमार शिंदे यांच्यात झालेल्या सदिच्छा भेटीत दिले. या भेटीत अनेक जुन्या राजकीय आठवणीना उजाळा देण्यात आला. मनमुराद चर्चा रंगली.

बुधवार दि. १० जुलै २०२४ रोजी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या सोलापूर येथील जनवात्सल्य या निवासस्थानी सोलापूर शहरमध्य विधानसभा मतदार संघाची जागा माकपाला सोडण्यासंबंधी पक्षाचे जिल्हा सचिव ॲड. एम.एच. शेख यांच्या नेतृत्वाखाली ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या उपस्थितीत शिष्टमंडळाद्वारे सदिच्छा भेट घेण्यात आली. यावेळी या शिष्टमंडळात कॉ. नलिनीताई कलबुर्गी, कॉ. युसुफ शेख (मेजर), कॉ. व्यंकटेश कोंगारी, कॉ. कुर्मय्या म्हेत्रे, कॉ. रंगप्पा मरेड्डी, कॉ. अब्राहम कुमार, कॉ. म.हनिफ सातखेड, कॉ. शंकर म्हेत्रे, अनिल वासम, दाऊद शेख, नरेश दुगाणे, विक्रम कलबुर्गी, मोहन कोक्कुल, अरुण सामल, शामसुंदर आडम, आदींची उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांना नवा पर्याय देणार : तुपकर

नागपूर : जातीधर्माच्या मुद्द्यावर सर्वच पक्ष लढतात, मात्र जगाचा पोशिंदा असलेल्या, संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढण्यासाठी कुणाला वेळ नाही. आम्ही शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर निवडणूक लढणार आहोत. बुलढाणा जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात ताकद दाखवणार. तिसरी आघाडी उभारून शेतकऱ्यांना नवा पर्याय देणार असल्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी नागपुरात बोलताना दिला. यासंदर्भात आमदार बच्चू कडू यांच्याशी देखील आपली प्राथमिक चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

# मुंबई विधानसभेवर संयुक्त संघटनेचा, दखल घेता कि जाता मोर्चा

**दैनिक यशसिद्धि न्यूज**

सिंदखेडराजा /दिपक म्हस्के :नागपूर : राज्यभरातील, हजारो बहुजन भूमिहीनाच्या गत २५ वर्षापासून प्रलंबीत महसूल जमीन व १८ वर्षापासून प्रलंबीत वनजमीन प्रश्नावर राज्य शासन व जिल्हा प्रशासनाचे कुंभकर्णी झोपेमुळे केंद्र व शासनाचे जमिन पट्टे बाबत प्रस्तावित निर्णय १९९१ केंद्र शासन आदिवासी वनहक्क निर्णय २००६- ०७ वन जमीन पट्टे भूखंड पट्टे तथा सर्वांसाठी घरे शासन निर्णय २०२२ असतांनाही राज्यातील हजारो हेक्टर जमीनीवाल मागासवर्गीय व गोरगरीब बहुजन भूमिहीन, बेघराना जमीन, भूखंड पट्टे न देता त्यांचे घरावर व जमिनिवर एन पावसाचे दिवस असताना मुंबईत झोपडपट्टी, बुलढाणा, अकोला, जलगांव जिल्ह्यात वन जमीन व महसुल गायरण जमीनीवर सौर ऊर्जा, पुनर्वसनासाठी बुलडोजर चालवुन जख्मी करूंन बेघर केलं. काहिनां हया घटना पाहून अनेकांनी प्राण गमवावे लागले. तर अनेकांना पेरण्या केल्या शेतातील ऊभे पिक व घर संबंधित प्रशासन बुलडोजरने उद्वस्त करण्यास तयार आहे.

ह्या शासनास व प्रशासनास अन्याया विरुद्ध जाब विचारण्यासाठी मुंबई विधानसभेवर ८ जुलै २०२४ ला मा.सर्वोच्च न्यायालया च्या २०११ च्या निर्णयानुसार १९९० पुर्वीचे एस.सी.एस.टी चे अतीक्रमण त्वरीत नियमीत करणे बाबत २०२४ मुंबई अधिवेशनात तात्काळ घोषणा करा. राज्यातील लाखो महसुल व गायरान जमिन धारकांच्या आर्थिक उत्थानासाठी मा. सर्वोच न्यायालय निर्णय व राज्य शासनाच्या २०११ च्या निर्णयानुसार मा. मुंबई उच न्यायालय नागपुर खंडपिठा व्दारे केलेल्या आदेशावर राज्य शासनाने मा.सर्वोच न्यायालय व मा.उच न्यायालय मुंबईत दाद मागावी. राज्यातील दलित, अत्याचार, प्रतिबंध, राज्यातील वन व महसुल अतिक्रमण धारकांची पेरणी केलेलं इस. सन २०२३-२४ वर्षा भरात पेरणी केलेले अतिक्रमण धारकांची पिकाची राष्ट्रीय संपत्ती म्हणुन संरक्षण करण्यात यावे. राज्यातील बहुजन शेतकरी, भुमिहीन, प्रकल्पग्रस्त, कामगार शेतमजुरच्या निवासी घराचे कायम पटटे व रमाई घरकुल अनुदान २.५ लक्ष करण्यात यावे. बहुजन भुमीहीनाची अत्यल्प असलेली कर्जा ची १०० टक्के कर्जमुक्ती घोषणा मुंबईत उच्च न्यायालयाच्या आदेशा वरुन व राज्यशासनाच्या निर्णयानुसार मुंबई उच न्यायालयात व नागपुर न्यायालय दाखल केलेल्या प्रलंबित प्रकरणी कार्यवाहीस स्थगीती आदी मागण्याची




## भूमिहीनना न्याय न मिळाल्यास राज्य विधानसभेच्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकणार : भाई प्रदीप अंभोरे

मुंबई अधिवेशनात घोषणा करा. यासाठी मुंबई विधान सभेवर बहुजन मुक्ती व भूमी मुक्ती मोर्चा महाराष्ट्र संयुक्त संघटना प्रमुख भाई प्रदीप अंभोरे यांचे नेतृत्वात शेकडो भूमिहीनांच्या उपस्थितीत भर पावसात सीएसटी ते आझाद मैदाना वर दखल घेता की जाता मोर्चा काढण्यात आला. मागण्याची राज्यशासन व जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी व दलित अदिवासी वन व महसुल जमीन अतिक्रमीतांना न्याय द्यावा. अन्यथा राज्यातील लाखो भूमिहीनांचा राज्य विधानसभा २०२४ च्या होणाऱ्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्यात येईल. असा इशारा संघटनेचे भाई प्रदीप अंभोरे यानी आझाद मैदान येथे मोर्चाप्रसंगी शासनास आवाहन केले आहे. याप्रसंगी शासनाच्या वतीने मा.मंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या निवासस्थानी रमेश गाडेकर, भिमराव खरात, भगवान गवई, रवी उमाळे, प्रकाश वानखेडे, मधुकर मिसाळ या प्रतिनिधीच्या शिस्टमंडळ द्वारे मोर्चाचे निवेदन सादर केले. येत्या १५ दिवसात संबंधित मंत्री महोदयांच्या उपस्थितीत बैठक घेऊ असे आश्वासन यावेळी दिले आहे.ज्ञानदेव मिसाळ,राजु काकडे, भरत मुंडे,अशोक सोणारे,इलियास भाई, रोशन वाको डे, दिपक तायडे, दिलीप गवई सरां गधर टापरे,सुनील दांडगे,समाधान वाकोडे कमलबाई वानखेडे सुमन शिंदे सह महिलाप्रमुख तथा मोर्चा ला विदर्भ,मराठवाडा,उत्तर महाराष्ट्र प्रदेश आदिवासी,मागासवर्गीय अल्पसंख्यांक समाजातील प्रतिनिधिक तरुण वयो वृद्ध स्त्री,पुरुष मोठ्या संख्येनं पडत्या पावसात आंदोलन यशस्वी करण्या साठी उपस्थित होते.

## श्रीपुरच्या कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक व श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास देशपातळीवर प्रथम क्रमांक तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार जाहीर

**दैनिक यशसिद्धि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्रीपुरच्या कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक व श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्यात देश पातळीवरील प्रथम क्रमांकाचा तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार जाहीर कारखाना कार्यक्षेत्रातील कामगार




सभासदांमध्ये उत्साहाचे वातावरण विक्रमी ऊस गाळपत वाड्याचा विठ्ठलराव शिंदे कारखाना प्रथम राज्यातील दहा कारखाने अव्वल राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाची घोषणा

माळशिरस तालुक्यातील श्रीपुर येथील सुधाकरपंत परिचारक व श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास देशपातळीवर देण्यात येणारा प्रथम क्रमांकाचा तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार मिळाला असलेली माहिती कारखान्याची चेअरमन तथा माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी दिली व राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने २०२२-२३ आर्थिक वर्षासाठी साखर कारखान्यासाठी जाहीर केलेल्या २१ पुरस्कारात महाराष्ट्राने दहा पारितोषिके मिळवून प्रथम क्रमांक देशातील सर्वोच्च सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखान्यासाठीचे मानाचे वसंत दादा पाटील पारितोषिक आंबेगाव तालुक्यातील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याला मिळाले आहे पारितोषिक वितरण सोहळा ऑगस्टमध्ये होणार आहे महासंघातर्फे दरवर्षी देशातील साखर कारखान्याचे मूल्यांकन करण्यात येते व त्याआधारे ऊस उत्पादकता तांत्रिक गुणवत्ता वित्तीय व्यवस्थापन जास्तीत जास्त ऊस गाळप सर्वोत्तम साखर उतारा सर्वात जास्त साखर निर्यात अशा विविध क्षेत्रातील चांगली कामगिरी करणाऱ्या सहकारी साखर कारखान्याची काटेकोर मूल्यमापन करून त्या आधारे पारितोषिक जाहीर करण्यात येतात केंद्रीय मुख्य संचालक साखर यांच्या अध्यक्षतेखाली समितीने २०२२-२३ साठीचे २१ पारितोषिके महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी जाहीर केली यावेळी महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईक नवरे उपस्थित होती

या स्पर्धेत महाराष्ट्रातील ३८ उत्तर प्रदेश ११ गुजरात ११ तामिळनाडू १० पंजाब आठ हरियाणा आठ कर्नाटक चार आणि मध्य प्रदेश उत्तरखंड प्रत्येकी एका कारखान्याने अशा एकूण १२ कारखान्यांनी सहभाग घेतला या देशातील उच्च साखर उतारा किमान सरासरी दहा टक्के असणाऱ्या महाराष्ट्र गुजरात व कर्नाटक या राज्याचा एक गट तयार करण्यात आला या गटात देशातील एकूण ५३ सहकारी साखर कारखान्यांचा सहभाग होता उर्वरित सरासरी दहा टक्के पेक्षा कमी उतारा राज्याचा दुसरा गट तयार करण्यात आला या गटात देशातील एकूण ३९ सहकारी साखर कारखान्याचा समावेश करण्यात आला त्यात उत्तर प्रदेश पंजाब तामिळनाडू हरियाणा मध्य प्रदेश उत्तरखंड इत्यादी राज्यांचाही समावेश करण्यात आला होता

# स्वेरीज् डी.फार्मसीचे यंदाही निकालात घवघवीत यश

## प्रथम वर्षात दिव्या पवार प्रथम तर द्वितीय वर्षात स्वप्नाली घाडगे प्रथम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यामध्ये प्रथम वर्षात दिव्या सुभाष पवार तर द्वितीय वर्षात स्वप्नाली धनाजी घाडगे या विद्यार्थिनी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. डी. फार्मसी महाविद्यालयाने बोर्डाच्या परीक्षेतील यशाची परंपरा यावर्षी देखील जोपासली आहे. विशेष म्हणजे डी. फार्मसी निकालात देखील विद्यार्थिनींनी अव्वल स्थान पटकावले आहे यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




पंढरपूर परिसरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिप्लोमा फार्मसीच्या शिक्षणासाठी यापूर्वी मुंबई, पुणे, सांगली, सोलापूर अशा मोठ-मोठया शहरात जावे लागत होते. वेळ व पैसा याचा अपव्ययही होत होता. विद्यार्थ्यांची होणारी ही गैरसोय पाहून शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करत असताना संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांनी पंढरपूर पंचक्रोशीत फार्मसीचे दालन सन २००६ साली उभे केले. याला विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आणि त्यातून ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्च शिक्षण घेवू लागले. बऱ्याचदा अनेक जण प्रवेशासाठी इच्छुक असूनही केवळ मर्यादित प्रवेश संख्येमुळे त्यांना शिक्षण घेता येत नव्हते त्यामुळे पालकांची अपेक्षा वाढली.

पुन्हा स्वेरी अंतर्गत सन २०२१ पासून डी. फार्मसीचे दुसरे नवीन महाविद्यालय उभे केले. अशा प्रकारे डी. फार्मसीची दोन महाविद्यालये स्वेरी कॅम्पस मध्ये थाटात उभी आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या डिप्लोमा फार्मसीच्या परीक्षेत प्रथम वर्षामध्ये दिव्या सुभाष पवार यांनी प्रथम (८१.९० टक्के), प्राजक्ता एकनाथ माळी यांनी द्वितीय (८०.९० टक्के) व महेक सलीम शेख यांनी तृतीय क्रमांक (८०.८० टक्के) मिळविला. तसेच द्वितीय वर्षामध्ये स्वप्नाली धनाजी घाडगे यांनी प्रथम (८६.१८ टक्के), प्राजक्ता संतोष शिंदे यांनी द्वितीय (८४ टक्के) व अमृता धनाजी पोरे यांनी तृतीय क्रमांक (८२.४६ टक्के) मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांना स्वेरीचे संस्थापक-सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व डी.फार्मसीचे प्राचार्य सतीश मांडवे यांच्या नेतृत्वाखाली सर्व प्राध्यापकांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक-सचिव डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख यांच्यासह संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे, इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# दान पारमिता फाउंडेशन संस्थेच्या अशोकन स्क्रिप्ट इन्स्टिट्यूटची कार्यकारिणी जाहीर

## ASI समितीच्या अध्यक्षपदी रुपाली गायकवाड यांची निवड

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : ६ जुलै शनिवारी दान पारमिता फाऊंडेशन अंतर्गत असलेल्या अशोकन स्क्रिप्ट इन्स्टिट्यूटची नवनिर्वाचित कार्यकारिणी निवड सर्वानुमते करण्यात आली. या संस्थेच्या वतीने २० ऑगस्ट रोजी सर जेम्स प्रिन्सेप यांच्या जयंती दिनी विश्र्व धम्मलिपि गौरव दिन साजरा केला जाणार आहे. विश्र्व धम्मलिपि गौरव दिवस गेल्या २ वर्षांपासुन साजरा होत आहे. या वर्षी दादर , मुंबई येथे साजरा होणार आहे. त्याबाबत पूर्वतयारी साठीची बैठक आज दिनांक शनिवार, ६ जुलै, २०२४ रोजी हॉटेल द मॅरीओन,पाथर्डी फाटा ,नाशिक येथे सर्व सक्रिय सभासदांच्या उपस्थित संपन्न झाली.

प्रथम सत्रात सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष सुनिल खरे यांनी बैठक बोलावण्याचा हेतु सर्वांना सविस्तर सांगितला.

संस्था स्थापन करण्याचा हेतु आणि संस्था नोंदणीकृत केल्याने कशा प्रकारे कामाला योग्य गती मिळते आणि चांगले आणि योग्य पद्धतीने काम केले तर सर्वापर्यंत धम्मलिपी, सर जेम्स प्रिन्सेप आणि महान चक्रवर्ती सम्राट अशोक यांचे कार्य पोहचेल असे सांगितले. तसेच नाशिक आणि नागपुर येथे झालेल्या विश्र्व धम्मलिपी गौरव दिनाचे अनुभव सांगितले.

संतोष अंभोरे यांनी सर जेम्स प्रिन्सेप आणि सम्राट अशोक यांचे कार्य किती महान आहे आणि आपण त्यांच्या प्रति कृतज्ञ राहुन त्यांच्या महान कार्याप्रति सजग राहुन त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे चालवला पाहिजे असे नमुद केले.

प्रविण जाधव यांनी कार्यक्रमाचे महत्व सांगितले आणि आपली दान पारमिता फाउंडेशन संस्था एक परिवार आहे. आपण सर्व जण एकत्र मिळून सोबत काम करुया, संस्था कशी वाढेल आणि धम्मलिपीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी आपण सर्वांनीच कटिबद्ध राहुया. बौध्द संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करूया असे यावेळी सांगितले. सदर बैठकीत कार्यक्रम कसा साजरा करायचा आणि त्यासाठी करावे लागणारे नियोजन आणि इतर संस्थेच्या कामाचा आढावा घेण्यात आला. तसेच उपस्थित सर्व सभासदांनी आपले विचार मांडले. सर्वांचे मत लक्षात घेऊन कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली.त्यानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

दुसऱ्या सत्रात दान पारमिता फाउंडेशन या संस्थेच्या अंतर्गत अशोकन स्क्रिप्ट इन्स्टिट्यूट (ASI) या समितीची कार्यकारिणी सर्वांनुमते निवड करण्यात आली.

अध्यक्ष रुपाली गायकवाड, कार्याध्यक्ष अर्चना वाघमारे, सचिव आकाश हजारे, खजिनदार मिलिंद भालेराव, संघटक युवराज वाघ, राजेंद्र पगारे, ज्ञानेश्र्वर सोनवणे, सदस्य म्हणून दिलीप वासनिक, संतोष जाधव, शांता मुलगे, वंदना बनसोडे तर समितीचे सल्लागार म्हणून मिलिंद तेलुरे यांची निवड करण्यात आली.

तसेच संस्थेच्या अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात विभागप्रमुख म्हणून निवड करण्यात आली. छत्रपती संभाजी नगर - वंदना बनसोडे, सचिन म्हस्के, नवी मुंबई- अर्चना वाघमारे, शांता मुलगे, मुंबई उपनगर - शिल्पा जाधव, मुंबई- आकाश हजारे, ज्ञानेश्र्वर सोनवणे, रुपाली गायकवाड, ठाणे - संतोष जाधव, जळगाव- मिलिंद भालेराव, जयपाल पगारे, रायगड- युवराज वाघ, रत्नागिरी- दिलीप वासनिक, नागपूर- अलका गवई, निर्झरा रामटेके, प्रगती मेश्राम, नाशिक - प्रवीण जाधव, संतोष आंभोरे, सुनील खरे यांची निवड करण्यात आली,

सदर बैठकी प्रसंगी , वर्षा कदम, शिल्पा जाधव, मंगल बोढारे, माधवी शिरसाठ, जयश्री गुंजाळ, अनिल बागुल, सचिन गायकवाड, अंकित दोंदे, नितीन पिंपळीसकर, रावसाहेब धिवर, विलास वाघमारे तसेच नाशिक , मुंबई , औरंगाबाद , शहापुर , रत्नागिरी , चाळीसगाव , जळगाव , इत्यादी शहरातुन लेणी अभ्यासक हजर होते. अत्यंत शिस्तबद्ध आणि खेळीमेळीच्या वातावरणात सदर बैठक संपन्न झाली.

या पुढेही आपली संस्था असेच कार्य करत राहील अशी ग्वाही दिली. त्यानंतर रूपाली गायकवाड यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.



# श्री विठ्ठल रुक्मिणीमातेस भाविकाकडून १ लक्ष रुपयाची देणगी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः नागपूर येथील भाविक विकास वडवाले यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीस १ लक्ष रुपयाची देणगी दिली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने देणगीदार यांचा सत्कार मंदिर समितीच्या सहाय्यक विभाग प्रमुख श्रीमती मनीषा जायकर यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. देणगी मंदिर समितीच्या अन्नछत्रासाठी प्राप्त झाली आहे.

# राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान अंतर्गत विविध घटकासाठी तालुका कृषी कार्यालयाकडे २५ जुलै पर्यंत अर्ज करावेत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान सन २०२४-२५ अंतर्गत अन्नधान्य पिके फ्लेक्झी घटक या घटकांतर्गत खालील बाबीसाठी तालुकास्तरावर अर्ज माहिती मागविण्यात येत आहेत. १.गोदाम बांधकाम साठी निकष - अन्नधान्य साठवणुकीसाठी २५० मे. टन क्षमतेसाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा १२.५० लाख यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदा अनुज्ञेय राहील. सदर बाब बँक कर्जाशी निगडीत असुन इच्छुक अर्जदार (शेतकरी उत्पादक संघ/कंपनी/ FPO/FPC) केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण योजना/नाबार्डच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रकल्प सादर करणे आवश्यक आहे.

२.शेतकरी उत्पादक संघ/कंपनी FPO/FPC साठी बिजप्रक्रिया संच साठी निकष - उत्पादीत बियाणावर प्रक्रिया करुन दर्जेदार बियाणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक संघ/कंपनी यांना बिज प्रक्रिया प्रकल्प उभारणी करण्यासाठी (यंत्र सामुग्री ब बांधकामासाठी) प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा रुपये १० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय आहे.३.शेतकरी गटासाठी बीज प्रक्रिया ड्रम / यंत्र यासाठी निकष -बियाण्यास मोठ्या प्रमाणावर बिज प्रक्रिया करण्यासाठी शेतकरी गटामार्फत बिज प्रक्रिया ड्रम / यंत्र खरेदीसाठी रुपये ८०००/- प्रति युनिट किंवा किंमतीच्या ५० टक्के अनुदान अनुज्ञेय आहे.४.पाण्याच्या स्त्रोतापासून शेतापरंत पाणी वाहून नेण्यासाठी पाईप यासाठी निकष - ५० टक्के किंवा रु. ५०/ मिटर एह. डी.पी.ई. पाईप, रु. ३५/ मिटर पी.व्ही.सी. पाईप किंवा जास्तीत जास्त रु. १५०००/ लाभार्थी. (महा डी.बी.टी. पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे.).५.पंप संच घेण्यासाठी निकष -५० टक्के किवा रु. १००००/ लाभार्थी जे कमी असेल ते. (महा डी.बी.टी. पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे. वरील सर्व बाबीसाठी शेतकरी उत्पादक संघ/कंपनी / FPO/FPC व वैयक्तीक शेतकरी यांनी त्यात्या पात्र असणा-याबाबीसाठी तालुकास्तरावर ऑफलाईन / ऑनलाईन पद्धतीने त्यात्या पात्र असणा- या बाबीसाठी दिनांक २५ जुलै २०२४ पर्यंत अर्ज करण्याचे व अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

# स्टार प्रवाहच्या आई कुठे काय करते मालिकेत सुरु होतोय नवा अध्याय

## महाराष्ट्राची सुगरण जोडी स्पर्धेत भाग घेऊन अरुंधती स्वीकारणार नवं आव्हान

**दैनिक यशसिध्दि न्यूज** मुंबई : स्टार प्रवाहची लोकप्रिय मालिका आई कुठे काय करतेमध्ये सुरु होणार आहे महाराष्ट्राची सुगरण जोडी स्पर्धा. अरुंधतीने या स्पर्धेत भाग घेत नवं आव्हान स्वीकारलं आहे. अरुंधतीला या स्पर्धेत साथ देणार आहे मिहीर शर्मा. अरुंधती आणि मिहीरला तोडीस तोड उत्तर देण्यासाठी अनिरुद्ध आणि संजनाने देखिल कंबर कसली आहे. त्यामुळे स्पर्धा चुरशीची होणार हे मात्र नक्की. अरुंधतीची स्वयंपाकाची आवड सर्वांनाच माहित आहे. या स्पर्धेत उतरण्याचं कारण फक्त स्वयंपाकाची आवड इतकंच नाही. तर अरुंधतीला आपलं घर म्हणजेच समृद्धी निवास वाचवायचं आहे. अनिरुद्ध-संजनाने घरावर हक्क दाखवलाय. समृद्धी निवास पुन्हा मिळवण्यासाठी अरुंधतीला पैश्यांची गरज आहे आणि म्हणूनच ती महाराष्ट्राची सुगरण स्पर्धेत भाग घेणार आहे. अरुंधतीला साथ देणारा मिहीर शर्मा उत्तम शेफ आहे. त्यामुळे ही जोडी या स्पर्धेत आपली छाप पाडण्यासाठी सज्ज आहेत. मात्र अरुंधती जिंकू नये यासाठी अनिरुद्ध आणि संजना देखिल या स्पर्धेत उतरले आहेत. त्यामुळे आई कुठे काय करते मालिकेतली ही स्पर्धा उत्कंठावर्धक होणार यात शंका नाही.मालिकेत पहिल्यांदा अश्याप्रकारची स्पर्धा होत असल्यामुळे सर्वांनाच उत्सुकता आहे. मालिकेची संपूर्ण टीम हा सीन करताना खूप धमाल करत आहेत. तेव्हा ही उत्कंठावर्धक चुरस अनुभवायची असेल तर पाहायला विसरु नका आई कुठे काय करते दुपारी २.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर. स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

# एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम अंतर्गत कांदाचाळ अनुदानासाठी अर्ज करावे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर /प्रतिनिधीः एकात्मिक फलोत्पादन विकाय कार्यक्रम या योजनेसाठी काढणीपश्र्चात व्यवस्थापण घटकांतर्गत जिल्हयास कांदाचाळ या घटकास अनुदान मंजुर झालेले असुन सदर घटकाची माहिती खालील प्रमाणे

अर्थसहाय्याचे स्वरुपः ५,१०,१५,२० व २५ मे. टन क्षमतेच्या कांदा चाळी उभारणीसाठी येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु.३५०० प्रति मे.टन याप्रमाणे क्षमतेनुसार अर्थसहाय्य देय राहील. ७००० रुपये प्रति मे.टन खर्च व ३५०० रुपये अनुदान प्रति मे.टन अनुदान

योजनेचा उद्देश :- कांदा पिकाचे साठवणूकीत होणारे नुकसान कमी करणे. कांदा पिकाची हंगामामध्ये आवक वाढुन कांदयाचे भाव कोसळणे तसेच हंगामाव्यतिरीक्त कांदयाचा तुटवडा निर्माण होऊन भाव वाढणे अशा समस्येवर अंशतः नियंत्रण मिळविणे.लाभार्थी निवडीचे निकष :- शेतकऱ्याने योजनेअंतर्गत अर्ज करताना त्यांच्या स्वतःच्या मालकीची जमीन असणे आवश्यक आहे. ७/१२ वर कादा पिकाची नोंद असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याकडे कांदापिक असणे बंधनकारक आहे. सदर योजनेचा लाभ वैयक्तिक कांदा उत्पादक शेतकरी, शेतकऱ्यांचा गट, स्वयंसहायता गट, शेतकरी महिला गट, शेतकऱ्यांचे उत्पादक संघ (Farmers Producer Organizations), नोंदणीकृत शेतीसंबंधी संस्था, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, सहकारी पणन संघ यांना घेता येईल. तरी जिल्हयातील सर्वसाधारण, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती व इतर सर्व प्रवर्गातील शेतक-यांना आवाहन करण्यात येते की, वरील प्रमाणे घटकासाठी अधिकाधिक शेतक-यांनी महा-डीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

# रोटरी क्लब ऑफ़ माढाचा सायकल बॅंक उपक्रम कौतुकास्पद : मिनलताई साठे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

माढा/प्रतिनिधीः रोटरी क्लब ऑफ माढाच्या वतीने विद्यार्थिनींसाठी राबवलेल्या सायकल बँकेचा उपक्रम हा कौतुकास्पद असून ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना याचा मोठा फायदा होणार असल्याचे मत नगराध्यक्ष मिनलताई साठे यांनी व्यक्त केले. रोटरी क्लब माढाच्या वतीने माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थिनींना मोफत सायकलीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी त्या बोलत होत्या.आपल्या भाषणात सौ साठे यांनी सहकार महर्षी गणपतराव साठे यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात काढलेल्या या प्रशालेच्या यशाची परंपरा येथील शिक्षक विद्यार्थी आणि पालक यांच्या सहकार्यातून योग्य पद्धतीने जोपासले जात असल्याबद्दल कौतुक केले. याचबरोबर रोटरी क्लबच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या सर्वच उपक्रमांना साठे परिवार कायम साथ देणार असल्याचे आश्र्वासन यावेळी त्यांनी दिले. याप्रसंगी रोटरीचे प्रांतपाल डॉ सुभाष पाटील यांनी प्रास्ताविकपर भाषणामध्ये माजी अध्यक्ष प्रमोद भैया वेदपाठक यांच्या संकल्पनेतून सुरू असलेला सायकल बँकेचा उपक्रम विद्यमान अध्यक्ष डॉ सोमेश्र्वर टोंगळे यांच्या कार्यकाळात सुरू असून भविष्यात शालेय विद्यार्थ्यांच्या सर्व अडीअडचणींसाठी रोटरी क्लब सर्वतोपरी मदत करणार असल्याचे सांगितले .याप्रसंगी विद्यमान अध्यक्ष डॉ सोमेश्र्वर टोंगळे यांनी माढा शहरातील ही प्रशाला गुणवत्तेमध्ये अग्रेसर असून यशाची परंपरा अखंडितपणे सुरू ठेवणाऱ्या या प्रशालेतील सर्व विद्यार्थी शिक्षक हे अभिनंदनीय आहेत. शाळेसाठी भविष्यामध्ये जे जे शक्य आहे त्या गोष्टी रोटरीच्या माध्यमातून देणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी नगराध्यक्ष मिनलताई साठे रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष नागनाथ घाडगे भारत लटके औदुंबर पवार रो सानप जमीर तांबोळी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे भैय्या साठे मुख्याध्यापक नागेश खेडकर आदी उपस्थित होते.

# सोलापुरात आयटी पार्कसाठी प्रयत्न करणार : दिलीप माने

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः शहरातील विद्यार्थी **शिक्षण येथे घेऊन जॉब** शोधण्यासाठी पुणे, बंगळुरू, मुंबई या ठिकाणी जात असून सोलापुरात आयटी पार्क नसल्याने विद्यार्थ्यांची कुचंबणा होत असून या आयटी पार्कसाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही माजी आमदार दिलीप माने यांनी दिली. येथील गुरुकुल कॉम्प्युटर्सच्यावतीने दहावी व बारावी परीक्षेत भरघोस यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान समारंभ माने यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गुरुकुल कॉम्प्युटरचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग चौधरी हे होते. याप्रसंगी ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काशीनाथ भतगुणकी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास रवी भोपळे, श्याम पाटील, मुख्याध्यापक व्हनमाने, महादेव जाधव, वांगीकर आदी उपस्थित होते. दरम्यान, यावेळी हद्दवाढ भागातील २२ शाळांमधील सर्व मुख्याध्यापकांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन संयोजक सचिन चौधरी यांनी केले.

